


# भारताचे शासन आणि राजकारण

DCDLIB
52595
321
BHO



डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे

Scanned with CamScanner

# प्रकरण नववे
# भारताचे संघराज्य आणि केंद्र-राज्य संबंध

संघराज्य ही दुहेरी शासनव्यवस्था असते आणि विविधता व एकात्मता, स्थानिकता व राष्ट्रीयता यांचा समन्वय घालण्याच्या दृष्टीने ती उपयुक्त ठरू शकते. भारताच्या आधुनिक इतिहासाचा विचार केल्यास इथे दोन प्रवाह ठळकपणे अस्तित्वात असल्याचे दिसते. एक आहे विविध समूहांच्या पारंपरिक पृथगात्मतेचा आणि दुसरा आहे या पृथगात्मतांना एकत्र आणू पाहणाऱ्या राष्ट्रीय एकात्मतेचा. स्वातंत्र्य-आंदोलनाच्या काळात एकात्मतेचा प्रवाह प्रभावी झाला असला तरी त्यामुळे पृथकतेचा प्रवाह पार नाहीसा होऊ शकला नव्हता. नवजात लोकशाहीच्या स्थैर्य व सातत्यासाठी तसेच आर्थिक, सामाजिक नवनिर्माणासाठी एक संघटित राष्ट्र म्हणून टिकून राहिले पाहिजे ही भावना तीव्र असतानाच दुसऱ्या बाजूने एकेकाळी स्वतंत्र व सार्वभौम असलेली शेकडो संस्थाने आपली अस्मिता पूर्णतया विसरू शकत नव्हती, मुस्लिम बहुसंख्येचे प्रांत केंद्रवर्चस्वाविषयी साशंक होते, शिवाय राज्याराज्यात असलेली भाषिक, वांशिक, भौगोलिक, धार्मिक विविधतासुद्धा पृथकपणाच्या प्रवाहाला पुष्टी देत होती. इतरांपेक्षा आपले असलेले भिन्नत्व, आपली स्वतंत्र अस्मिता व संस्कृती जतन करण्याची स्वाभाविक प्रवृत्ती विविध लोकसमूहांच्या ठायी होती. एकता व पृथकता या प्रवृत्तींमध्ये अंतर्विरोध न येता योग्य समन्वय व्हावा, त्या एकमेकींना मारक न ठरता पूरक व पोषक ठराव्यात या भूमिकेतून संविधानकारांनी येथे संघराज्यरचनेचा स्वीकार केला आहे.

राष्ट्रीय व प्रांतिक अशा दोन पातळ्यांवर समांतर शासनप्रणाली निर्माण करून त्यांची अधिकारक्षेत्रे स्पष्टपणे संविधानातच आखून दिली गेली आहेत. या अधिकारवाटणीवर संविधानसभा ज्या परिस्थितीत काम करीत होती तिचा परिणाम अनिवार्यतः पडला आहे. फाळणी झाली होती, हिंदु-मुस्लिम दंग्यांचे वणवे जागोजाग पेटले होते. अशी राजकीय परिस्थिती नेहमीच फुटीर शक्तींना अत्यंत पोषक ठरण्याची शक्यता असते. देशाचे आणखी विघटन होऊ नये असा बंदोबस्त संविधानात करण्याची निकड संविधानकारांना वाटणे स्वाभाविक होते. त्यादृष्टीने केंद्रसत्ता शक्तिशाली करण्यावाचून त्यांना पर्याय नव्हता. अधिकार विभागणीत त्यांनी केन्द्राला झुकते माप दिलेच, शिवाय प्रसंगोपात्त संघराज्यरचना एकात्म पद्धतीत परिवर्तित होईल अशी व्यवस्थाही त्यांनी करून ठेवली. त्यामुळेच भारतीय राज्यव्यवस्थेचे वर्णन 'संघराज्यसदृश' किंवा 'सहकारी संघराज्य' असे केले जाते. ही राज्यव्यवस्था आकाराने संघराज्यात्म पण आशयाने एकात्म असल्याची टीकाही काही लेखक करतात.



Scanned with CamScanner

**केंद्र-राज्य-संबंधांची सांविधानिक चौकट :**

केंद्रराज्यसंबंधांचा विचार आपण मुख्यत्वे प्रत्यक्ष राजकीय प्रक्रियांच्या अनुषंगाने करणार असलो तरी या प्रक्रिया काही रिक्त अवकाशात घडत नसतात तर संविधानाने ज्या अधोसंरचना (इन्फ्रास्ट्रक्चर) उभ्या केलेल्या असतात त्याच्या चौकटीतच विविध संस्थांमधील संबंध आकार घेत असतात. त्यामुळे केंद्र व घटकराज्ये यांच्यातील प्रत्यक्ष संबंधांची चर्चा करण्यापूर्वी ते ज्या सांविधानिक चौकटीत विकसित झाले तिचा आपण आधी परिचय करून घेऊ.

केंद्रशासन व राज्यशासने यांच्या ज्या अधिकारकक्षा व कार्ये संविधानकारांनी नमूद केली आहेत त्यांची चर्चा पुढील ३ गटांत करता येईल :

(क) वैधानिक अधिकारांची वाटणी

(ख) प्रशासकीय अधिकारांची वाटणी

(ग) वित्तविषयक अधिकारांची वाटणी

**(क) वैधानिक अधिकारांची वाटणी :**

वैधानिक (म्हणजे कायदे करता येण्याच्या) अधिकारांची वाटणी करताना संविधानकारांनी (१) संघशासनाच्या अधिकारकक्षेत येणारे विषय (केंद्रसूची), (२) राज्यशासनांच्या अधिकार-कक्षेत येणारे विषय (राज्यसूची) आणि (३) संघ व राज्ये या दोहोंच्याही अधिकारक्षेत्रांत येणारे विषय (समवर्तीसूची) असे वर्गीकरण करून तीन स्वतंत्र याद्या संविधानात समाविष्ट केल्या आहेत. संविधानाच्या ७ व्या अनुसूचीत अत्यंत तपशीलवार स्वरूपात या याद्या आहेत. या तीनही याद्यांमध्ये जे अधिकारविषय अंतर्भूत नाहीत त्यांना उर्वरित अधिकार किंवा शेषाधिकार असे म्हणतात. असे सर्व शेषाधिकार संघशासनाच्या कक्षेत असतील असे संविधानात नमूद केले आहे.

**केंद्रसूची :** केंद्रसूचीत अंतर्भूत असलेल्या एकूण ९७ अधिकारविषयांचे वर्गीकरण पुढील ६ प्रकारात करता येईल :

**(१) आंतरराष्ट्रीय संबंधांशी निगडीत अधिकार :** आंतरराष्ट्रीय कायद्याच्या दृष्टीने संपूर्ण संघराज्य हेच एक एकक (unit) असल्यामुळे स्वाभाविकच आंतरराष्ट्रीय संबंधांशी संबंधित सर्व अधिकारविषय संघसूचीत अंतर्भूत केले आहेत. परराष्ट्र धोरण राजनैतिक व व्यापारविषयक प्रतिनिधित्व, संयुक्त राष्ट्रसंघाशी संबंधित सर्व बाबी, परराष्ट्रांबरोबरचे तह व करारनामे, युद्ध व शांतता, आंतरराष्ट्रीय परिषदा व अन्य संस्था आंतरराष्ट्रीय निर्णयासंबंधीची कार्यवाही, नागरिकत्व-स्थायिकत्व-परकीयत्व या संबंधीचे निर्णय, प्रत्यर्पण (extradition), पारपत्रे व प्रवेशपत्रे (passports and visa), भारताबाहेरील स्थळांच्या तीर्थयात्रा, समुद्रातील व आकाशातील चाचेगिरी व अन्य गुन्हे, परदेशव्यापार व आयात-निर्यात इ. थोडक्यात, ज्या अधिकार-विषयांवरील कायद्यांचा संबंध जगातील इतर राष्ट्रांशी येतो अशा सर्व बाबी संघाधीन आहेत.

**(२) संरक्षणविषयक अधिकार :** संपूर्ण देशाच्या संरक्षणाची जबाबदारी अंतिमतः संघ शासनाची असल्यामुळे संरक्षणविषयक कायदे करण्याचा व्यापक अधिकार त्या शासनास असतो.

Scanned with CamScanner

या अधिकारात पुढील विषय मोडतात. देशाचे व देशाच्या सर्व भागांचे संरक्षण-संरक्षणसिद्धता व सेनानियोजनाशी संबंधित सर्व बाबी; नौसेना, भूसेना व वायुसेना तसेच संघराज्याची अन्य कोणतीही सशस्त्र सेना, लष्करी छावण्या, संरक्षणविषयक कारखाने-शस्त्रे अग्निशस्त्रे, दारूगोळा व स्फोटक पदार्थ; संसदेने कायद्याद्वारे संरक्षणसंबंधित असे घोषित केलेले उद्योगधंदे, संरक्षण, परराष्ट्र व्यवहार व देशाची सुरक्षितता यांच्याशी संबंधित कारणांसाठी असलेली प्रतिबंधक स्थानबद्धता, केंद्रीय गुप्तवार्ता व अन्वेषण केंद्र, इ.

(३) **दळणवळणविषयक बाबी** : देशाच्या भिन्न भागांना जोडणारी दळणवळणाची साधने संघसूचीत असणे औचित्यपूर्ण ठरते. त्यात रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग, राष्ट्रीय जलमार्गावरील नौपरिवहन व नौकानयन, व्यापारी नाविकांचे शिक्षण-प्रशिक्षण; दीपगृहे, प्रकाशनौका, संकेतदीप आणि नौका व विमाने यांच्यासाठी इतर सुरक्षा उपबंध; कायद्यान्वये मोठी बंदरे म्हणून घोषित केलेली बंदरे-त्यांचे परिसीमन व प्राधिकरण; खलाशांची व सागरी रुग्णालये; हवाई मार्ग, विमाने व हवाई वाहतूक, विमानतळे, वैमानिक प्रशिक्षण, उपरोक्त मार्गांनी उतारूंची व मालाची ने-आण, डाक व तारा, दूरध्वनी, बिनतारी यंत्रे, ध्वनिक्षेपण व संप्रेषणाचे तत्सम मार्ग इत्यादींचा समावेश होतो.

(४) **आर्थिक बाबी** : ज्या आर्थिक व्यवहारांना संपूर्ण संघराज्याच्या हितसंबंधांवर बरावाईट परिणाम पडू शकतो त्यांच्याशी संबंधित कायदे करण्याचा अधिकार संघशासनास असतो. उदा. आंतरराज्य व्यापार विनिमय, कर्जे, चलन-नाणी व कायदेशीर विनिमयसाधने; परदेशी हुंडणावळ, परराष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांची कर्जे; भारतीय रिझर्व बँक, डाकघर बचत बँक, राष्ट्रीयकृत बँका, विमा कंपन्या, आर्थिक मंडळे व व्यापारी संस्था; पेटन्टस्, व्यापारी बोधचिन्हे, वजने आणि मापे, सार्वजनिक हिताखातर संसदेने कायद्यान्वये नियंत्रित केलेले उद्योगधंदे, तेलविहिरी व खनिजांच्या खाणी, ज्वालाग्राही पदार्थ.

(५) राज्यसूची व समवर्ती सूची या दोहोंत ज्यांचा अंतर्भाव नाही अशा उर्वरित अधिकार बाबी.

(६) **स्वरूपतः केंद्रसूचीत येणाऱ्या बाबी** : काही अधिकार-विषयांचे स्वरूपच असे असते की त्यांचा अंतर्भाव संघसूचीत केला जाणे अपरिहार्य असते. उदा. केंद्रीय लोकसेवा आयोग, केंद्रीय लोकसेवा, अखिल भारतीय सेवा; संसद सदस्यांचे विशेषाधिकार व संरक्षणे; राष्ट्रपती, राज्यपाल, केंद्रीय मंत्री यांचे पगार व भत्ते, केंद्र व राज्ये यांच्या हिशेबांची तपासणी, खानेसुमारी, उच्च व सर्वोच्च न्यायालयांची रचना, यंत्रणा व अधिकारिता; निर्वाचन मंडळ आणि आंतरराज्य स्वरूपाच्या सर्व बाबी.

**राज्यसूची** : राज्यसूचीतील बहुसंख्य विषय हे प्रादेशिक स्वरुपाचे व स्थानिक महत्त्वाचे आहेत. संघसूची व समवर्ती सूची या दोन्ही प्रदीर्घ व समावेशक असल्यामुळे राज्यसूचीची व्याप्ती आपोआपच मर्यादित झाली आहे. राज्यसूचीत पुढील गोष्टी आहेत : सार्वजनिक

सुव्यवस्था, पोलिस, न्यायदान - दुय्यम न्यायालयांची स्थापना व रचना; बालगुन्हेगारांसाठी सुधार-केंद्रे; स्थानिक स्वराज्यसंस्था; सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता, रुग्णालये, केंद्रीय विद्यापीठे सोडून इतर विद्यापीठे व शिक्षण, मादक पेये, अपंगकल्याण, स्मशाने, राज्यशासन-नियंत्रित ग्रंथालये, पुराणवस्तूसंग्रहालये, संघसूचीत नसलेली दळणवळण साधने, पशुसंगोपन, पाणीपुरवठा, धरणे व कालवे, जंगले व वन्यपशुसंरक्षण, मच्छीमारी, राज्यपातळीवरील औद्योगिक व आर्थिक बाबी यांचा अंतर्भाव राज्यसूचीत होतो. स्वरूपतःच राज्यसूचीत मोडणाऱ्या अधिकारविषयांत राज्यविधिमंडळाच्या (केंद्रीय कायद्यानुसार) निवडणुका, आमदार, मंत्री, अध्यक्ष वगैरेंची वेतने व भत्ते, आमदारांचे विशेषाधिकार व संरक्षणे, राज्य लोकसेवा आयोग वगैरेंचा समावेश होतो.

**समवर्ती सूची :** या सूचीतील अधिकारविषयांबाबत केंद्र व राज्य या दोहोंना कायदे करता येतात. पण एकतर अमूक एका विषयावर संघशासन जोपर्यंत कायदा करीत नाही तोपर्यंतच राज्यशासनांना तो करता येतो; आणि दुसरे असे की राज्याचा एखादा कायदा जर आणि ज्या मर्यादेपर्यंत केंद्राच्या कायद्याशी विसंगत असेल तर आणि त्या मर्यादेपर्यंत तो रद्दबातल ठरतो. विसंगत नसल्यास दोन्ही अंमलात राहतात. समवर्ती सूचीतील अधिकारविषयांचे तीन गट पडतात.

**(१) कायदा-सुव्यवस्थेशी निगडीत बाबी :** फौजदारी कायदा व कार्यपद्धती, राज्यरक्षणार्थ सार्वजनिक सुरक्षेसाठी आवश्यक असलेली प्रतिबंधक स्थानबद्धता, मुदतीचा कायदा व लवाद यांसह दिवाणी कामाची पद्धती, सर्वोच्च न्यायालय सोडून अन्य न्यायालयांची बेअदबी.

**(२) व्यक्तिगत हक्कविषयक बाबी :** विवाह, घटस्फोट, अर्भके व अज्ञान मुले, दत्तक, जन्ममृत्यू नोंद, मृत्यूपत्रे, अविभक्त कुटुंबाची वाटणी, शेतजमिनी सोडून इतर मालमत्तेचे हस्तांतरण, खतपत्रे आणि दस्तऐवज यांची नोंद; दिवाळखोरी, निर्वासितांचे पुनर्वसन, विश्वस्तनिधी इ.

**(३) सामाजिक-आर्थिक क्षेत्रांतील तसेच संकीर्ण बाबी :** आर्थिक व सामाजिक नियोजन, व्यापारी व औद्योगिक मक्तेदारी, कामगार संघटना, मजूर समस्या, सामाजिक सुरक्षितता आणि सामाजिक विमा, रोजगार व बेकारी, कामगार कल्याण, संसर्गजन्य रोगांच्या आंतरराज्य प्रसारास प्रतिबंध, किंमतनियंत्रण, वीज, वृत्तपत्रे, पुस्तके व मुद्रणालये इ.

**(ख) प्रशासकीय अधिकारांची वाटणी :**

केंद्र व राज्ये यांचे प्रशासकीय अधिकार त्यांच्या विधिविषयक अधिकारांशी समकक्ष असतात. कारण त्यांनी केलेल्या कायद्यांची त्या त्या क्षेत्रांत अंमलबजावणी करण्याचा अधिकार त्यांना असणे क्रमप्राप्तच ठरते. अर्थात संविधानात त्या दोहोंच्या स्वतंत्र अधिकार सूची आहेत. त्यांच्यातील अधिकारांशी समकक्ष प्रशासकीय अधिकार त्यांना असणे समजू शकते. पण समवर्ती सूचीतल्या अधिकारांचे काय ? संविधानात त्याचे उत्तर असे आहे की समवर्ती सूचीतील कोणत्याही अधिकारविषयावर कायदा केंद्र व राज्ये या दोघांना करता येत असला तरी अंमलबजावणीचा अधिकार मात्र सामान्यतः घटक-राज्यांनाच असतो.

Scanned with CamScanner

दुसरे असे की, केंद्रसरकार आपली प्रशासकीय शक्ती राज्यांकडे प्रत्यायुक्त (delegate) करू शकते. अनु. २५८ नुसार राष्ट्रपती राज्यसरकारच्या संमतीने त्या सरकारकडे वा त्याच्या अधिकाऱ्याकडे केंद्राच्या कार्यकारी कक्षेतील कामे करण्याचे अधिकार सशर्त वा बिनशर्त सोपवू शकतो. संसद कायद्यान्वये राज्यसरकारवर वा त्याच्या अधिकाऱ्यावर राज्याच्या कक्षेत नसलेली कामे व शक्ती सोपवू शकते.

केंद्र व राज्ये यांच्यातील प्रशासकीय अधिकारांच्या वाटणीची चर्चा चार मुख्य शीर्षकांतर्गत केली जाऊ शकते : (१) राज्यपाल, (२) नोकरशाही, (३) सुव्यवस्था आणि (४) राज्यांना आदेश देण्याचा केंद्राचा अधिकार.

(१) राज्यपाल हा राज्याचा कार्यकारी प्रमुख असला तरी त्याची नियुक्ती, बदली व पदच्युतीचे अधिकार राष्ट्रपतीला असतात. राज्यपाल मुख्यमंत्री व मंत्रिपरिषद यांची नेमणूक करतो व त्यांच्या सल्ल्याने कारभार करतो. विधेयकाचे रूपांतर कायद्यात होणे त्याच्या स्वाक्षरीवर अवलंबून असते. तो राष्ट्रपतीच्या मान्यतेसाठी विधेयक राखून ठेवू शकतो. राज्यात सांविधानिक रचना नीटपणे कार्य करू शकत नाहीत असे त्याचे मत झाल्यास राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शिफारस तो राष्ट्रपतीला करू शकतो.

(२) नोकरशाहीच्या सेवाभरतीसाठी संघ पातळीवर केंद्रीय लोकसेवा आयोग व राज्यपातळीवर राज्य लोकसेवा आयोग असतात. पण याखेरीज आणखी एक प्रकार अखिल भारतीय सेवांचा असतो. अनु. ३१२ अन्वये राज्यसभा विशेष ठराव मंजूर करून अखिल भारतीय सेवा आयोग निर्माण करण्याचा अधिकार संसदेस देऊ शकते. या सेवांचे वैशिष्ट्य असे की त्यांतील सनदी अधिकारी आपले पगार व भत्ते राज्यशासनाकडून घेत असले तरी त्यांच्या वेतनश्रेणी व दर्जा मात्र केंद्रशासन ठरवून देते. त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचा अधिकारही फक्त केंद्रीय गृहमंत्रालयास असतो.

(३) राज्यांतर्गत शांतता, सुव्यवस्था व पोलिस यंत्रणा या बाबी राज्याच्या अधिकार कक्षेत असतात. मात्र परकीय आक्रमण व अंतर्गत सशस्त्र उठाव अशा प्रसंगी राज्यात सुव्यवस्था टिकून राहावी व संविधानानुसार राज्यकारभार सुरू राहावा ही जबाबदारी केंद्रशासनाची असते.

(४) अनेक प्रकारच्या परिस्थितींमध्ये संघशासन राज्यशासनांस आदेश देऊ शकते. संसदेने त्यासाठी नव्याने कायदा करण्याची गरज नसते. त्या अशा :

(क) केंद्रीय कायद्यानुसार घटकराज्याचे वर्तन राहावे यासाठी, तसेच प्रत्येक राज्याची कार्यकारी सत्ता अशा रीतीने चालवली जावी की जेणेकरून केंद्राला आपली कार्यकारी सत्ता चालवण्यात अडथळा येऊ नये यासाठीही संघशासन राज्यशासनास आदेश देऊ शकते.

(ख) प्रत्यायुक्त (delegated) अधिकार केंद्राच्या वतीनेच राज्यशासन चालवीत असल्यामुळे ते केंद्राच्या निगराणी व नियंत्रणाखाली येतात.

(ग) राष्ट्रीय व लष्करी महत्त्वाची म्हणून जी दळण-वळण साधने घोषित झालेली असतात त्यांची निर्मिती, देखभाल व संरक्षण करण्याबाबत केंद्रसरकार राज्यांना आदेश देऊ शकते.

(घ) मागास जातींचे कल्याण व्हावे तसेच भाषिक अल्पसंख्य जमातींना स्वतःच्या मातृभाषेतून शिक्षण मिळावे यासाठीही आदेश दिले जाऊ शकतात.

(ङ) राज्यातील रेल्वेमार्ग सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यक ते आदेश देता येतात.

(च) परचक्र वा सशस्त्र उठाव अशा कारणांनी देशाची वा देशाच्या विशिष्ट भागाची सुरक्षितता धोक्यात आली आहे अशी राष्ट्रपतीची खात्री झाल्यास तो राष्ट्रीय आणीबाणी घोषित करू शकतो. आर्थिक पत धोक्यात आली असे पटल्यास आर्थिक आणीबाणी पुकारू शकतो, या दोन्ही प्रसंगी केंद्राने केलेल्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ते आदेश केंद्रसरकार देऊ शकते.

केंद्रसरकारने दिलेल्या आदेशांचे पालन न करण्याच्या कारणावरून संबंधित राज्यावर राष्ट्रपती राजवट लागू केली जाऊ शकते (अनु. ३५६).

आर्थिक प्रशासनाच्या क्षेत्रात तर केंद्रशासनाचे राज्यांवरील वर्चस्व अधिकच स्पष्ट आहे. वाहतूक, दळण-वळण, चलनावळ, परराष्ट्रांकडून व आंतरराष्ट्रीय संस्थांकडून मिळणारी कर्जे व अर्थसाह्य, विमा, बँकिंग ही खास महत्त्वाची आर्थिक क्षेत्रे प्रशासनदृष्ट्या केंद्रसरकारच्या अखत्यारात आहेत. याशिवाय वित्तपुरवठा व नियोजन ही क्षेत्रे संघाधीन असल्यामुळे घटकराज्यांच्या राजकीय तसेच आर्थिक व वित्तीय प्रशासनाचे सुसूत्रीकरण व मार्गदर्शन करण्याचा अधिकार संघशासनास प्राप्त होतो.

**(ग) वित्तविषयक अधिकारांची वाटणी :**

आपापल्या सांविधानिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी पर्याप्त अर्थसाधने संघ व राज्ये या उभयतांना उपलब्ध असल्याखेरीज संघराज्याचा कारभार सुरळीतपणे चालूच शकत नाही. भारतीय संविधानाने करांच्या आकारणीसंबंधीच्या वैधानिक क्षेत्रांचे काटेकोर वाटप केंद्र व राज्ये यांच्यात केले आहे. केंद्रशासन व राज्यशासन कोणकोणत्या गोष्टींवर कर आकारू शकतात हे तपशिलांत नोंदवून कर आकारणीविषयीचे शेषाधिकार केंद्रशासनास सुपूर्द केले आहेत.

**केंद्र प्रशासनाच्या अधिकारकक्षेत** पुढील बाबींवरील करांचा अंतर्भाव होतो, म्हणजे तत्संबंधी कायदे हे शासन करू शकते : ज्या मुद्रांक-शुल्कांचा (stamp duty) उल्लेख संघसूचीत आहे त्यावरील कर, शेतजमिनीव्यतिरिक्त इतर मिळकतींवरील तसेच त्यांच्या वारसदारीवरील कर, रेलभाडे व वाहनावळ यावरील कर, रोखे-बाजार (stock exchange) व वायदेबाजारातील देवघेवींवरील मुद्रांक-शुल्काव्यतिरिक्त अन्य कर, वृत्तपत्रांची खरेदीविक्री तसेच वृत्तपत्रीय जाहिराती यांवरील कर, आंतरराज्य खरेदीविक्रीवरील कर, रेल्वे, जलमार्ग वा विमानमार्गे जाणारे उतारू व माल यावरील सीमा (terminus) कर, निर्यात कर, अबकारी जकात, कार्पोरेशन कर इ.

**राज्यांच्या अधिकारक्षेत्रात** जमीनमहसूल, शेतजमिनीचे स्वामित्व व वारसदारी यावरील कर, खनिज द्रव्यांच्या हक्कांवरील कर, राज्यात बनणारी मादक पेये, मद्यार्क औषधे वगैरेंवरील अबकारी कर, स्थानिक क्षेत्रात येणाऱ्या मालावरील जकात, वृत्तपत्रीय व्यतिरिक्त अन्य

जाहिरातींवरील कर, वाहन व उतारू तसेच जनावरे वा नावा यावरील कर, टोलनाकी, डोईपट्टी इ. चा समावेश होतो.

न्यायालयीन मुद्रांक शुल्क व फी वगळता गोळा होणारी शुल्के, अन्य समवर्ती बाबींबद्दल घेण्यात येणारी फी यांचा अंतर्भाव **समवर्ती अधिकारक्षेत्रात** होतो.

जी शासनसत्ता अमूक एक कर लावते वा वसूल करते तिलाच सामान्यतः त्या कराचे उत्पन्न मिळते हा संघराज्य व्यवस्थेचा एक संकेत आहे. भारतीय राज्यव्यवस्थेत मात्र या संकेताला महत्त्वाचे ४ अपवाद संविधानात नमूद आहेत :

**(क) अनु. २६८ नुसार** काही करांची आकारणी संघ शासन करते मात्र त्यांची उगराणी (वसुली) राज्य शासने करतात आणि त्यांचे उत्पन्न भारताच्या एकत्रित निधीत न जाता ते त्या त्या राज्याला नेमून दिले जाते. उदा. केंद्रसूचीत उल्लेखिलेली मुद्रांक शुल्के आणि औषधी व प्रसाधन पदार्थांवरील उत्पादन शुल्के.

**(ख) अनु. २६९ नुसार** काही करांची आकारणी व उगराणी संघशासन करते पण त्यांचे उत्पन्न संबंधित राज्यांना नेमून दिले जाते. उदा. शेतजमिनी व्यतिरिक्त अन्य संपत्तीच्या वारसाहक्काबाबतची शुल्के व संपदा शुल्के उतारूंवरील वा मालावरील सीमा कर, भाडी व वाहनावळी यावरील कर इ. राज्यांमध्ये या कर-उत्पन्नाची वाटणी कशी करायची यासंबंधीची तत्त्वे कायद्याद्वारे संसद निर्धारित करू शकते.

**(ग) अनु. २७० नुसार** काही करांची आकारणी व उगराणी केंद्रशासन करते आणि त्यांचे उत्पन्न केंद्रशासन व राज्यशासने यांच्यात वितरित केले जाते. उदा. कृषिप्राप्तीव्यतिरिक्त अन्य प्राप्तींवरील कर. प्रत्येक वित्तवर्षात (financial year) राष्ट्रपती वित्तमंडळाच्या सल्ल्याने जे प्रमाण (टक्केवारी) ठरवून देईल त्यानुसार या उत्पन्नाची घटकराज्यांमध्ये वाटणी केली जाते.

**(घ) अनु. २७२ नुसार** काही अपवादात्मक प्रसंगी केंद्रशासनाने आकारणी व उगराणी केलेल्या करांचा विशेष वाटा राज्यशासनास देण्याचा अधिकार केंद्रशासनास आहे. संसदेने केलेल्या कायद्याद्वारे, ज्या राज्यातून ते शुल्क गोळा केले असेल त्या विशिष्ट राज्याला त्या उत्पन्नाचा संपूर्ण वा काही भाग देण्याचा उपबंध केला जाऊ शकतो. त्या विशिष्ट राज्यापुरताच हा उपबंध लागू असतो. एखाद्या राज्यात आर्थिक ओढगस्त असली वा आर्थिक संकट कोसळले तर प्रस्तुत तरतुदीनुसार संघशासन अशा आपद्ग्रस्त राज्याला मदत करू शकते.

वित्तविषयक अधिकारांच्या विभागणीच्या संदर्भात संघशासनाकडून राज्यशासनांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीचा व अनुदानांचाही उल्लेख आवश्यक ठरतो. अशा अनुदानांखेरीज राज्यांचा कारभार चालूच शकत नाही. संविधानाने तीन प्रकारच्या अनुदानांची तरतूद केली आहे. पहिल्या प्रकारात बंगाल, बिहार, आसाम व ओरिसा या राज्यांना ताग व तागाचा माल यावरील निर्यात कराच्या वार्षिक उत्पन्नाचा ठराविक वाटा देण्याऐवजी प्रतिवर्षी भारत एकत्रित निधीतून काही रक्कम सहाय्यक अनुदान म्हणून संघशासन अनु. २७३ अन्वये देऊ शकते. ही रक्कम किती

Scanned with CamScanner